"करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास" या योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये संचालनालयाच्या वेबसाईटच्या प्रसिध्दीसाठी दूरदर्शन व आकाशवाणी केंद्रामधून केलेल्या जाहिरात खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्र. कौविउ-२०१६/प्र.क्र.९२/रोस्वरो-१
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२ मार्च, २०१८

वाचा:-

१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र. रोस्वरो-२००७/ प्र.क्र.३०/ रोस्वरो-१, दि. ०३ जानेवारी, २००८.
२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र.कौविरोउसं-११ (ग्रंथालय अभ्यासिका)/जाहिराती/(प्र.क्र.०५/१५)/८६०१, दि. १७/०६/२०१६.

प्रस्तावना :-

रोजगाराच्या संधीची माहिती व मार्गदर्शन बेरोजगार उमेदवारांना उपलब्ध होण्यासाठी तसेच जिल्हा मार्गदर्शन केंद्रात येणा-या बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य स्पर्धा परीक्षांची माहिती देणारी पुस्तके, मासिके इत्यादी उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाने संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ०३/०१/२००८ च्या शासन निर्णयान्वये **"करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास"** ही योजनांतर्गत योजना सुरू केली आहे. सदर शासन निर्णयातील प्रपत्र-अ मधील परिच्छेद (क) (३) मध्ये **"वेबसाईटला प्रसिध्दी देणे"** ही बाब अंतर्भूत असल्याने, महारोजगार या वेबपोर्टलची जाहिरात दूरदर्शन व आकाशवाणी केंद्रामधून सन २०१५-१६ मध्ये करण्यात आली होती. या जाहिरातीच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत संचालनालयाने त्यांच्या संदर्भाधीन क्र. २ च्या दिनांक १७/०६/२०१६ च्या पत्रान्वये विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने दूरदर्शन व आकाशवाणी केंद्रामधून केलेल्या जाहिरातीच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास या योजनेंतर्गत योजनेत सन २०१५-१६ मध्ये संचालनालयाच्या **"महारोजगार"** या वेबसाईटच्या प्रसिध्दीसाठी दूरदर्शन व आकाशवाणी केंद्रामधून केलेल्या जाहिरातीसाठी झालेल्या रुपये ६,६७,४३०/- (रुपये सहा लाख सदुसष्ट हजार चारशे तीस फक्त) च्या खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील खर्च मागणी क्रमांक झेड-ए-१, २२३० कामगार व सेवायोजन, ०२-सेवायोजन, ००१-संचालन व प्रशासन, (०१) (०३) सेवायोजन कार्यालय, ग्रंथालय सदृष्य अभ्यासिका निर्माण करणे, लेखाशिर्ष २२३० १५५५, २६ जाहिरात व प्रसिध्दी या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित केलेल्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-दोन, अ. क्र.८, नियम क्रमांक १७ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दिनांक ३१/०३/२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६८/ व्यय-६, दिनांक १७/०३/२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३२२१७३९२६४००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kailas Laxman Dhakane

Digitally signed by Kailas Laxman Dhakane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD and ED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6283d0b58cf739d67ca64d09498 6494b972b39cf4df46464c9bd30ae8293d9 de, cn=Kailas Laxman Dhakane
Date: 2018.03.22 17:41:53 +05'30'

(कैलास ढाकणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
८. वित्त विभाग, व्यय-६/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२.
९. कक्ष अधिकारी, रोस्वरो-२, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.निवड नस्ती, रोस्वरो-१.